जा. क्र. / ४२३ /२०२६,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली,
दिनांक : १८/०२/२०२६.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली

निविदा सुचना (Tender Notice)

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली तर्फे दिनांक **०८.०३.२०२६** रोजी ता. देसाईगंज (वडसा), जिल्हा गडचिरोली येथील **तालुका क्रिडा संकुल, देसाईगंज (वडसा) येथिल खुल्या परिसरात** आयोजित महा विधी सेवा शिबिरासाठी छायाचित्रण **(Photography), चित्रीकरण (Videography) आणि थेट प्रक्षेपण (Live Coverage)** करण्यासाठी अनुभवी पुरवठादारांकडून बंद लिफाफ्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

- **दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक, वेळ व ठिकाण:**
  २५.०२.२०२६, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत.
  ठिकाण: जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, गडचिरोली.
- **दरपत्रक उघडण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण:**
  दिनांक: २६.०२.२०२५ रोजी, सकाळी १०.३० वाजता.
  ठिकाण: जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली कार्यालय.

इच्छुकांनी दरपत्रकांमध्ये अंतर्भुत असणारी माहिती, सविस्तर अटी व शर्ती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली आणि दिवाणी व फौजदारी न्यायालय देसाईगंज (वडसा) या कार्यालयांचे सुचना फलकावर आणि जिल्हा न्यायालय, गडचिरोलीचे संकेतस्थळावर (https://gadchiroli.dcourts.gov.in) पहाव्यात किंवा कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

दिनांक: १८.०२.२०२६
ठिकाण: गडचिरोली

(अं. पुं. खानोरकर)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
गडचिरोली.

छायाचित्रण व चित्रीकरणासाठी दरपत्रक

अ.क्र.	सेवेचा प्रकार	तपशील
१	छायाचित्रण **(Photography)**	संपूर्ण कार्यक्रमाचे उच्च दर्जाचे डिजिटल फोटो **(Full HD)**
२	**चित्रीकरण (Videography)**	कार्यक्रमाचे संपूर्ण व्हिडीओ रेकॉर्डींग **(HD Resolution)**
३	**थेट प्रक्षेपण (Live Coverage)**	स्टेजवरील आणि पेंडॉलमधील LED आणि LCD स्क्रीनवर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण.
४	**LED/LCD स्क्रीन व मॉनिटर**	सुमारे १५०० ते २००० लोकांचे अनुषंगाने स्टेजवर १ मोठा **LED/LCD व २ मॉनिटर** आणि पेंडॉलमध्ये योग्य आकाराचे व संख्येचे **LED/LCD** स्क्रीन बसवणे.
५	**संपादन (Editing)**	निवडक फोटोंचे अल्बम आणि कार्यक्रमाची संपादित व्हिडीओ क्लिप (Pendrive/Hard Disk मध्ये).

अटी व शर्ती

१. इच्छुक सेवा पुरवठादारांनी आपले दरपत्रक एका बंद पाकिटावर **"महा विधी सेवा शिबिर-छायाचित्रण व चित्रीकरणासाठी दरपत्रक"** असे लिहून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली या कार्यालयात विहित मुदतीत सादर करणे अनिवार्य राहील.

२. पुरवठादारांनी दिलेले दर, हे वस्तू व सेवा कर (GST) आणि इतर सर्व शासकीय करांसह असणे आवश्यक आहे. एकदा निश्चित केलेले दर प्रक्रियेदरम्यान बदलता येणार नाहीत.

३. साहित्याची ने-आण आणि वाहतूकीचा सर्व खर्च पुरवठादाराचा राहील, यासाठी अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

४. दरपत्रक उघडण्याच्या वेळी इच्छुक पुरवठेदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात.

५. दरपत्रक उघडण्याच्या निश्चित केलेल्या वेळी आणि तारखेला जर पुरवठेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी अनुपस्थित राहील तरीही त्यांच्या अनुपस्थितीत दरपत्रकांचे लिफाफे उघडले जातील. अशा वेळी उघडलेल्या दरांबाबत किंवा प्रक्रियेबाबत पुरवठादाराची कोणतीही तक्रार किंवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही.

६. सर्व तांत्रीक निकष आणि अटी पूर्ण करणाऱ्या पुरवठादारांपैकी ज्या पुरवठादाराचे दर सर्वात कमी असतील त्या पुरवठादाराची या कामासाठी निवड केली जाईल.

७. दरांची तुलना करताना 'एकूण खर्च' (Grand Total) विचारात घेतला जाईल. प्रत्येक वस्तूचा वेगवेगळ दर न पाहता, संपूर्ण पॅकेजसाठी जो पुरवठादार सर्वात कमी दर देईल त्याला प्राधान्य दिले जाईल.

८. निवडलेल्या पुरवठादाराला कार्यादेशा मध्ये कार्यक्रमाचे नियोजीत वेळेबाबत आगाऊ सुचना दिली जाईल.

९. कॅमेरा, ट्रायपॉड, LED Walls, LCD स्क्रीन्स आणि आवश्यक केबल्स पुरवठादाराने स्वत: आणणे, तसेच आवश्यक ते सर्व तांत्रीक मनुष्यबळ आणि साहित्य पुरवणे अनिवार्य आहे.

१०. व्हिडीओ आणि ऑडीओची गुणवत्ता स्पष्ट असावी. थेट प्रक्षेपणामध्ये कोणताही तांत्रीक व्यत्यय येऊ नये.

११. कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी किमान २ तास आधी सर्व सेटअप तयार असणे आवश्यक राहील. सदरचा कार्यक्रम ४ ते ७ तास चालेल. याची पुरवठादारांनी नोंद घ्यावी.

१२. संपूर्ण कार्यक्रमाचा मुळ (Raw) आणि संपादित डेटा पुरवठादाराला जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोलीकडे सुपूर्द करावा लागेल.

१३. काम समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर आणि अंतिम आउटपुट (फोटो (हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी) / व्हिडीओ) सादर केल्यानंतरच शासकीय नियमानुसार देयक अदा केले जाईल. आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१४. कोणतीही पुर्वसुचना किंवा कारण न देता प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा पुर्ण अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली कडे राखीव राहील.

दिनांक: १८.०२.२०२६
ठिकाण: गडचिरोली

18/2/26
(अं. पुं. खानोरकर)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
गडचिरोली.